# महाराष्ट्रातील नागरीकरण : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ . सिद्धार्थ हरिदास मेश्राम**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग )
सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय , कामठी
siddhmeshram@gmail.com

**प्रास्ताविक :**

शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक , आर्थिक व सांस्कृतिक प्रेरकशक्ती मानले जाते . परंतु नागरीकरणा सोबतच नवीन समस्याही निर्माण झाल्या आहेत संयुक्त राष्ट्र संघाने शहरीकरणामुळे भारतात भविष्यात निर्माण होणाऱ्या संकटा बद्दल धोक्याचा इशारा दिला आहे . संयुक्त राष्ट्र संघाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालातून देशातील राजधानी दिल्ली हे शहर सर्वाधिक लोकसंख्येचे टोकियो नंतर दुसरे शहर असल्याचे स्पष्ट झाले आहे . सध्या भारतातील शहराच्या वाढीची गती पाहता येत्या पंधरा ते वीस वर्षात भारतात जगातील सर्वात मोठी शहरे असतील . शेतीतील घटते उत्पन्न व ग्रामीण भागातील रोजगाराची कमतरता यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर शहरात स्थलांतरित होत आहेत .

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी महाराष्ट्रातील मराठवाडा हैदराबाद राज्यांशी तर विदर्भातील सर्व जिल्हे मध्य प्रदेशाशी जोडले गेले होते, परंतु 1952 मध्ये महाराष्ट्र हे स्वतंत्र भाषिक राज्य असावे म्हणून संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे आयोजन करण्यात आले. 1953 साली भारत सरकारने राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना करून राज्याची भाषिक तत्त्वावर निर्मिती झाली पाहिजे असा करार केला, त्या कराराला नागपूर करार असे म्हणतात. भारतामध्ये 1956 या वर्षापासून अनेक राज्यांची भाषावार निर्मिती झाली असून महाराष्ट्राची निर्मिती 1 मे 1960 रोजी करण्यात आली. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्रफळ 3,07,713 चौ.कि.मी. असून क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रामध्ये 2011 अखेर 36 जिल्हे, 27 महानगरपालिका आणि 358 तालुके असून महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 11,23,72,972 इतकी आहे, त्यापैकी 45.23 प्रतिशत लोकसंख्या नागरी भागात राहते. महाराष्ट्र हे राज्य औद्योगिक दृष्ट्या प्रगतशील असून नागरीकरणात देशामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे

**नागरीकरणाची व्याख्या :**

- संयुक्त राष्ट्र संघाच्या मते , नागरीकरण हे ग्रामीण वसाहतीचे तसेच उत्पादनाचे स्थलांतरण होय .
- ज्या शहरात नगर परिषद , महानगरपालिका किंवा कँटोन्मेंट बोर्ड आहे , ज्या भागाची लोकसंख्या पाच हजार असून 75 प्रतिशत नागरिक शेतीवर काम करीत नसतात , अशा भागाला शहर म्हणून संबोधण्यात यावे .
- लोकसंख्या शास्त्रानुसार , विशिष्ट कालखंडात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होत जाणे म्हणजे नागरीकरण होय

थोडक्यात , जोपर्यंत नागरी लोकसंख्या आणि एकूण लोकसंख्या याचे गुणोत्तर वाढत जाईल तोपर्यंत नागरीकरण होत राहील . नागरीकरण ही एक प्रक्रिया आहे , या प्रक्रियेतूनच अनेक शहरे अस्तित्वात आली आहेत

**अध्ययनाची उद्दिष्टे :**

1. महाराष्ट्र राज्यातील नागरीकरणाच्या वाढीच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील शहरांमध्ये नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा उहापोह करणे.
3. नागरीकरणाच्या कारणांचा शोध घेणे.
4. नागरी करणावरील समस्या करीता उपाय योजना सुचविणे.

**महाराष्ट्रातील नागरीकरण :**

संपूर्ण देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतरामुळे महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये मध्ये कमालीची वाढ झाली आहे. ही वाढ अतिशय विषम स्वरूपाची आहे. त्यामध्ये सुद्धा प्रादेशिक विषमता दिसून येते. महाराष्ट्राच्या पूर्व भागाच्या तुलनेत पश्चिम भागामध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक वाढल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भामध्ये नागरीकीकरणाची पातळी सर्वात कमी आहे. याउलट औद्योगिकीकरण, माहिती व तंत्रज्ञान आणि शैक्षणिक प्रगतीमुळे मुंबई, पुणे आणि नागपूर या जिल्ह्यातील शहरीकरणाच्या बाबतीत झपाट्याने वाढ होत आहे.

कोष्टक क्र.1

महाराष्ट्र राज्यांतील नागरीकरण प्रवृत्ती

| जनगणना वर्ष | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रतिशत प्रमाण | जनगणना वर्ष | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1901 | 16.59 | 1961 | 28.22 |
| 1911 | 15.13 | 1971 | 31.17 |
| 1921 | 18.5 | 1981 | 34.99 |
| 1931 | 18.6 | 1991 | 38.73 |
| 1941 | 21.11 | 2001 | 42.43 |
| 1951 | 28.75 | 2011 | 45.22 |

स्त्रोत –जनगणना अहवाल -2011

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्येमध्ये 1901 पासून 1931 ते 1961 हे जनगणना वर्ष अपवाद वगळता त्यामध्ये सातत्याने वाढ झाली आहे. 1947 साली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर 1951 मध्ये झालेल्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येत 7.64 प्रतिशतची भर पडली. ही भर एवढी जास्त होती की, महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण 28.75 एवढे झाले. त्यानंतर मात्र नागरी लोकसंख्या वाढीच्या दरामध्ये सातत्यता दिसून येते. 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये नागरी दशवार्षिक वाढीचा दर हा 2.83 प्रतिशत असल्याचे दिसून येते

**महाराष्ट्रातील नागरीकरणाचे जिल्हा निहाय वितरण :**

2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या नागरीकरणाची प्रवृत्ती बघितली असता असे लक्षात येते की, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या जिल्ह्यांची नागरी लोकसंख्या 25 लाखांहून

अधिक आहे. त्या खालोखाल औरंगाबाद, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि अमरावती या जिल्ह्यातील नागरी लोकसंख्या 10 लाखापेक्षा जास्त आहे .

कोष्टक क्र.2

महाराष्ट्र राज्यांतील नागरीकरणाचे जिल्हानिहाय विभागणी

| अ.क्र. | जिल्हा | एकूण | नागरी | नागरी लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण | नागरी लोकसंख्येतील दशवार्षिक वाढ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नंदुरबार | 1,646,177 | 275,182 | 16.72 | 35.78 |
| 2 | धुळे | 2,048,781 | 571,747 | 27.91 | 28.23 |
| 3 | जळगाव | 4,224,442 | 1,343,458 | 31.80 | 27.61 |
| 4 | बुलढाणा | 2,588,039 | 549,389 | 21.23 | 16.06 |
| 5 | अकोला | 1,818,617 | 721,849 | 39.69 | 15.04 |
| 6 | वाशिम | 1,196,714 | 211,656 | 17.69 | 18.61 |
| 7 | अमरावती | 2,887,826 | 1,036,692 | 35.90 | 15.24 |
| 8 | वर्धा | 1,296,157 | 420,873 | 32.47 | 29.48 |
| 9 | नागपुर | 4,653,171 | 3,178,194 | 68.30 | 21.60 |
| 10 | भंडारा | 1,198,810 | 233,757 | 19.50 | 33.02 |
| 11 | गोंदिया | 1,322,331 | 225,700 | 17.07 | 57.36 |
| 12 | गडचिरोली | 1,071,795 | 117,937 | 11.00 | 75.34 |
| 13 | चंद्रपुर | 2,194,262 | 769,838 | 35.08 | 15.75 |
| 14 | यवतमाळ | 2,775,457 | 599,205 | 21.59 | 31.06 |
| 15 | नांदेड | 3,356,566 | 913,832 | 27.23 | 32.62 |
| 16 | हिंगोली | 1,178,973 | 178,871 | 15.17 | 16.13 |
| 17 | परभणी | 1,835,982 | 569,870 | 31.04 | 17.45 |
| 18 | जालना | 1,958,483 | 377,232 | 19.26 | 22.53 |
| 19 | औरंगाबाद | 3,695,928 | 1,616,601 | 43.74 | 48.70 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | नाशिक | 6,109,052 | 2,598,167 | 42.53 | 34.10 |
| 21 | ठाणे | 11,054,131 | 8,503,094 | 76.92 | 44.06 |
| 22 | मुंबई उपनगर | 9,332,481 | 9,332,481 | 100.00 | 8.01 |
| 23 | मुंबई | 3,145,966 | 3,145,966 | 100.00 | 5.75 |
| 24 | रायगड | 2,635,394 | 972,809 | 36.91 | 81.89 |
| 25 | पुणे | 9,426,959 | 5,739,716 | 60.89 | 36.63 |
| 26 | अहमदनगर | 4,543,083 | 913,071 | 20.10 | 13.61 |
| 27 | बीड | 2,585,962 | 514,685 | 19.90 | 32.97 |
| 28 | लातूर | 2,455,543 | 625,458 | 25.47 | 27.58 |
| 29 | उस्मानाबाद | 1,660,311 | 281,598 | 16.96 | 20.72 |
| 30 | सोलापुर | 4,315,527 | 1,398,439 | 32.40 | 14.13 |
| 31 | सातारा | 3,003,922 | 570,228 | 18.98 | 43.23 |
| 32 | रत्नागिरी | 1,612,672 | 263,610 | 16.35 | 37.15 |
| 33 | सिंधुदुर्ग | 848,868 | 106,998 | 12.60 | 29.98 |
| 34 | कोल्हापुर | 3,874,015 | 1,229,896 | 31.75 | 17.09 |
| 35 | सांगली | 2,820,575 | 719,432 | 25.51 | 13.62 |
| 36 | परभणी | 1,836,086 | 307,170 | 16.73 | -- |
| | महाराष्ट्र | 112,372,972 | 50,827,531 | 45.23 | 23.67 |

स्रोत –जनगणना अहवाल -2011

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, 2001 ते 2011 च्या दशकात नागरी लोकसंख्येमध्ये रायगड (81.89), गडचिरोली (75.34) आणि गोंदिया (57.36) या जिल्ह्यांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. हे दिसून येत असले तरी तेथील नागरी लोकसंख्येचे प्रमाण अतिशय अल्प आहे. 25 ते 50 प्रतिशत च्या दरम्यान नागरी वाढ झालेल्या जिल्ह्यामध्ये औरंगाबाद, ठाणे, सातारा, रत्नागिरी, पुणे, नंदुरबार, नाशिक, भंडारा, बीड, नांदेड, यवतमाळ, सिंधुदुर्ग, वर्धा धुळे, जळगाव आणि लातूर हे पंधरा जिल्हे आहेत. उर्वरित 16 जिल्ह्यांमध्ये नागरी लोकसंख्येत झालेली वाढ ही 25 प्रतिशत पर्यंत झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यामध्ये मागील दशकांमध्ये

23.67 प्रतिशत एवढी नागरी लोकसंख्येत वाढ झालेली आहे. महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येपेक्षा सरासरी प्रतिशत वाढ झालेले 19 जिल्हे आहेत.

**महाराष्ट्रातील दशलक्ष लोकसंख्या असलेली शहरे :**

2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण 10 शहरे अशी आहेत की,त्या शहराची नागरी लोकसंख्या 10 लाखाहून अधिक आहे. उदा. मुंबई शहरामध्ये ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई या शहरांचा समावेश केला जातो तर पुणे शहरांमध्ये पिंपरी-चिंचवड या शहराचा समावेश होतो. भारतामध्ये मुंबई, पुणे, नागपूर नाशिक, वसई व विरार आणि औरंगाबाद अशी सहा शहरे दशलक्षी शहरे म्हणून ओळखली जातात.

कोष्टक क्र.3

महाराष्ट्र राज्यांतील नागरी दशलक्षी शहरे

| अ.क्र. | दशलक्षी शहराचे नाव | लोकसंख्या | शहर /उपनगर लोकसंख्या | लिंग गुणोत्तर | साक्षरता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | 12,442,373 | 18,414,288 | 853 | 89.73 |
| 2 | पुणे | 3,124,458 | 5,049,968 | 948 | 89.56 |
| 3 | नागपुर | 2,405,665 | 2,497,777 | 963 | 91.92 |
| 4 | ठाणे | 1,841,488 | 1,841,488 | 888 | 89.41 |
| 5 | पिंपरी चिंचवड | 1,727,692 | 1,727,692 | 833 | 89.22 |
| 6 | नाशिक | 1,486,053 | 1,562,769 | 899 | 89.85 |
| 7 | कल्याण डोंबिवली | 1,247,327 | 1,247,327 | 920 | 91.37 |
| 8 | वसई विरार | 1,222,390 | 1,222,390 | 886 | 88.57 |
| 9 | औरंगाबाद | 1,175,116 | 1,189,376 | 929 | 87.49 |
| 10 | नवी मुंबई | 1,120,547 | 1,120,547 | 837 | 89.62 |

स्त्रोत –जनगणना अहवाल -2011

वरील कोष्टकावरून असे लक्षात येते की, मुंबई या शहराची नागरी लोकसंख्या सर्वात जास्त असून त्यानंतर अनुक्रमे पुणे व नागपूर शहराची नागरी लोकसंख्या आहे. महाराष्ट्रातील दशलक्षी शहरांमध्ये लिंग गुणोत्तर कमी असल्याचे दिसून येते. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड (833) आणि मुंबई (853) या शहरातील लिंग गुणोत्तर कमी असून नागपूर आणि पुणे या शहराचे लिंगगुणोत्तर अनुक्रमे 963 आणि 948 इतके आहे. तसेच साक्षरतेची पातळी शहरी भागात 90 प्रतिशतच्या दरम्यान असल्याचे दिसते.

**महाराष्ट्रातील नागरीकरणाची वैशिष्ट्ये :**

1. भारतातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी 13.15 प्रतिशत नागरी लोकसंख्या ही महाराष्ट्र राज्यात आहे. नागरी लोकसंख्येच्या बाबतीत भारतामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो तसेच महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त दशलक्षी शहरे आहेत.
2. भारतामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत उत्तर प्रदेशचा प्रथम क्रमांक असून महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच 2001च्या तुलनेत 2011 मध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये 17.8 दशलक्ष लोकसंख्येची भर पडली आहे.
3. संपूर्ण देशात सोबतच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून शहरी भागाकडे झालेल्या स्थलांतरामुळे महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये 1991 ते 2011 या वीस वर्षाच्या कालावधीत 30.54 दशलक्ष हून 50.83 दशलक्ष पर्यंत भर पडली.
4. महाराष्ट्राच्या नागरीकरणाच्या संदर्भात झालेली वाढ अतिशय विषम स्वरूपाची आहे. महाराष्ट्राच्या पूर्व भागाच्या तुलनेत पश्चिम भागांमध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून मराठवाडा आणि विदर्भामध्ये नागरीकरणाची पातळी सर्वात कमी आहे.
5. महाराष्ट्रातील मुंबई आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये 100 प्रतिशत नागरीकरण झालेले असून सिंधुदुर्ग (12.60 प्रतिशत), गडचिरोली (11 प्रतिशत) जिल्ह्यांमध्ये नागरीकरणाचे प्रमाण सर्वात कमी आहे. महाराष्ट्र मध्ये एकूण सहा नागरीकरण विभाग आहेत. त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, वसई-विरार आणि औरंगाबाद या सर्व विभागाची लोकसंख्या ही दहा लक्षाहून अधिक आहे.
6. महाराष्ट्रातील शहरांमध्ये लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे रोजगाराची हमी, शिक्षण आणि उच्च दर्जाचे राहणीमान या घटकांमुळे देशाच्या विविध भागातून लोक शहराकडे आकर्षिले जातात. भारतातील नागरीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. परंतु एकूण लोकसंख्येची तुलना केली असता महाराष्ट्रामध्ये असणारी 50.83 दशलक्ष लोकसंख्या ही भारतातील सर्व राज्यातील नागरी लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक आहे.
7. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार केला असता, भारतात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक असून भारतातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी 13.5 प्रतिशत लोकसंख्या महाराष्ट्रात राहते. महाराष्ट्र खालोखाल उत्तर प्रदेशात 11.8 प्रतिशत नागरी लोकसंख्या आहे. उर्वरित कोणत्याही राज्यामध्ये हे प्रमाण 10 प्रतिशत हून अधिक नाही.
8. महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्या मध्ये 1931 आणि 1961 हे दोन जनगणना वर्ष अपवाद वगळता 1901 पासून लोकसंख्येत सातत्याने वाढ झाली आहे. 1951 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये दशवार्षिक 7.64 प्रतिशत इतकी सर्वात जास्त शेकडा वाढ होऊन हे प्रमाण 28.75 एवढे झाले होते. 2011 या वर्षात महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण 45.22 इतके असून हे प्रमाण भारताच्या नागरी लोकसंख्येच्या प्रमाणाच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून येते.
9. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये जिल्हानिहाय नागरीकरणाची प्रवृत्ती बघितली असता असे निदर्शनास येते की, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, मुंबई, नाशिक या जिल्ह्यांची नागरी लोकसंख्या 25 लाखाहून अधिक आहे. पूर्व महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये नागरी लोकसंख्येत झालेली प्रतिशत वाढ जरी अधिक असली तरी एकंदरीत लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे.

10. 2001 ते 2011 या दहा वर्षाच्या कालावधीत नागरी लोकसंख्येमध्ये 75 प्रतिशत पेक्षा जास्त वाढ रायगड आणि गडचिरोली या जिल्ह्यामध्ये झालेली आहे. एकूण नागरी लोकसंख्येत सर्वाधिक वाढ ठाणे

आणि पुणे जिल्ह्यामध्ये झालेली आहे. महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येत मागील दशकांमध्ये 23.67 प्रतिशत एवढी वाढ झालेली आहे. महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येपेक्षा सरासरीने वाढ झालेले 19 जिल्हे आहेत. तसेच 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण 10 दशलक्षी शहरे आहेत.

11. महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक नागरीकरण झालेले तीन, जास्त नागरीकरण झालेले दोन, मध्यम नागरीकरण झालेले पंधरा आणि कमी नागरीकरण झालेले सोळा जिल्हे आहेत. महाराष्ट्रात सद्यस्थितीत 27 महानगरपालिका असून मुंबई महानगरपालिका ही सर्वात पहिली आहे. तसेच 2021 च्या जनगणना अहवालामध्ये महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण साठ टक्क्यांहून अधिक होऊ शकते असे भाकीत आहे.

**नागरीकरणाची प्रमुख कारणे :**

भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती अलीकडच्या काही दशकांमध्ये वाढली आहे. महाराष्ट्र राज्यस्तरावर ही नागरीकरणाच्या प्रक्रियेने वेग पकडला असून शहराच्या लोकसंख्येत वाढ होत आहे.

1. **स्थलांतरण :** नैसर्गिक लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा स्थलांतरित लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असल्यामुळे नागरीकरण वेगाने घडून येत असल्याचे दिसून येते.
2. **औद्योगिकीकरण :** महाराष्ट्रामध्ये औद्योगिकीकरण ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अधिक झालेले आहे. मुंबई नंतर पुणे, नागपूर आणि औरंगाबाद ही शहरे उद्योग व्यवसायामुळे झपाट्याने वाढली आहेत. त्यामुळे मोठ्या शहरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढलेली आहे.
3. **शहर सीमा विस्तार :** शहरांमध्ये वाढत्या लोकसंख्येच्या गर्दीमुळे तसेच शहरालगतच्या खेडी शहरांमध्ये समाविष्ट होत असल्यामुळे शहरांच्या सीमा विस्तारित होत आहे.
4. **पायाभूत सोयी–सुविधेत वाढ :** वाहतूक व दळणवळण, शैक्षणिक सुविधा, व्यापारी बाजारपेठ, सेवा क्षेत्राचा विस्तार इत्यादी क्षेत्रात सुधारणा झाल्यामुळे शहरांच्या आकारमानात वाढ झालेली दिसून येते.
5. सामाजिक वातावरण, व्यक्तिमत्व विकास, कौशल्यपूर्ण उत्पादन, धार्मिक महत्त्व, प्रशासकीय कार्यालय व ठिकाणे आणि शहरी जीवनाचे आकर्षण या सर्व बाबींमुळे नागरीकरण प्रवृत्तीत वाढ होते.

**नागरीकरणाच्या समस्या :**

नागरीकरण हे जसे आर्थिक, सामाजिक व वैज्ञानिक दृष्ट्या प्रगतीचे द्योतक असले तरी शहरांतर्गत व्यवस्थेचा विचार केला तर शहरांमध्ये अनेक समस्या नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या दिसून येतात.

1. **शहरांच्या आकारमानात वाढ :** शहरांमधील वाढती लोकसंख्या नागरी सेवावर ताण निर्माण करणारी आहे उदा. मुंबई शहरांचे अवाढव्य स्वरूप
2. **लोकसंख्येच्या घनतेत वाढ :** महाराष्ट्रात मुंबई, ठाणे व नागपूर या शहरांची घनता अधिक असून त्यामध्ये सतत वाढ होत आहे त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहे.
3. **मूलभूत सोयी सुविधांची समस्या :** मोठ्या शहरांमध्ये जागेच्या टंचाईमुळे घराच्या किमंती वाढत आहे. शहरालगतच्या वस्त्यांमध्ये पाणी, वीज, रस्ते, रुग्णालय, सांडपाण्याची व्यवस्था, कचरा उचलणारी यंत्रणा आणि वाहतूक व इंधन व्यवस्थेवरील ताण या समस्या शहरी जीवनात सामान्य झाल्या आहेत.
4. **झोपडपट्टीची समस्या व वाढती गुन्हेगारी :** नागरीकरणामुळे झोपडपट्टीतील लोकसंख्येत वाढ होऊन तसेच अशिक्षितपणामुळे आणि बेरोजगारीमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीत पण वाढ होत आहे. उदा. धारावी झोपडपट्टी

5. **शैक्षणिक समस्या :** आर्थिक दृष्ट्या संपन्न व्यक्तीच उच्च शिक्षणाच्या प्रवाहामध्ये टिकतो आहे. ही बाब भविष्याच्या दृष्टीने गंभीर आहे.
6. **प्रशासकीय समस्या :** शहराच्या मानाने प्रशासन व्यवस्था अपुरी पडत आहे. प्रशासनातील निर्णयात दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार व राजकीय हस्तक्षेप वाढत असल्यामुळे शहराचा विकास पुरेशा प्रमाणात होत नाही.

**उपाय योजना :**

नागरीकरण आणि आर्थिक विकास यांच्यामध्ये अतिशय जवळचा संबंध आहे. नागरीकरणामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत वाढ होत असली तरी दुसऱ्या बाजूने दिवसेंदिवस समस्यांमध्ये भर पडत आहे. त्या समस्या कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलणे गरजेचे आहे.

1. **सरकारी उपाययोजना :** यामध्ये केंद्र व राज्य सरकार द्वारे केलेल्या उपाययोजनांचा समावेश होतो. वित्तपुरवठा व अर्थसहाय्य, मूलभूत सोयीसुविधा, प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण व योग्य अंमलबजावणी ग्रामीण भागाचा विकास, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण सुविधा इत्यादी विकास कामे नियमितपणे करण्याची गरज आहे.
2. **नागरी संस्थांनी करावयाच्या उपाययोजना :** यात नगराचे नियोजन, प्रशासन विषयक विविध समित्या आणि सुधारणा, खाजगी लोकांचा सहभाग, कर वसुली, खर्चामध्ये काटकसर, नवनवीन उपक्रमांमध्ये खत निर्मिती, इ- कचऱ्याचे व्यवस्थापन, समस्या निवारण पथकाची स्थापना तसेच कर्मचाऱ्यासाठी मूलभूत सोयी सुविधा इत्यादी नियोजन करून योग्य ती अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.
3. **समाज घटकांनी करावयाच्या उपाययोजना :** यामध्ये समाजातील लोकांच्या कर्तव्याचा, प्रामाणिक प्रयत्नाचा तसेच गैर संस्थात्मक संस्थांनी करावयाच्या प्रयत्नांचा समावेश होतो.

**समारोप :**

प्रस्तुत पेपर मध्ये महाराष्ट्रातील नागरीकरण, नागरीकरणाची जिल्हानिहाय प्रवृत्ती, नागरीकरणाची कारणे, समस्या व त्यावरील उपाय योजना आणि महाराष्ट्राच्या नागरीकरणाची वैशिष्ट्ये यांचे सविस्तरपणे अध्ययन करण्यात आले आहे. तरी नागरी प्रशासनाला सर्वच प्रश्न सोडविता येणे शक्य नाही कारण नागरीकरणामुळे रोज नवनवीन प्रश्न निर्माण होत आहेत. हे नविन प्रश्न व समस्याचा अभ्यास संशोधकाला करता येईल असे नम्रपणे सुचवावेसे वाटते.

**संदर्भ :**

1. गायकवाड जे.व्ही. (2012) महाराष्ट्रातील नागरीकरण स्वरूप आणि समस्या , महाराष्ट्र पन्नास वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा ,प्रकाशक- सेंटर फोर इकॉनोमिक अंड सोशल स्टडीज, अमरावती
2. जहागिरदार दि.व्य. (2007) महाराष्ट्रातील नागरीकरण कारणे स्वरूप आणि परिणाम, अर्थसंवाद,खंड-30,अंक-4 पृ.386
3. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल-2012-13
4. Census of India-2011
5. http://studymaterial.unipune.ac.in